सांकेतिक क्रमांक - २०१४१२०११३०३४५६३२७

सुदी (संग्राहक) ल.पा. योजना ता.मालेगांव, जि.वाशिम या योजनेस प्रथम सुधारित प्रशासकिय मान्यता प्रदान करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्र. लपात २२१२/(४९/१२)/लपा-२
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :०२/१२/२०१३

पहावे : १) कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे पत्र क्र. जा.क्र.२९५/विपाविम/कातां-७/(७७/२००८)/दि.११.०१.२०१२ तसेच दि.१३.७.२०१२ चे पत्र.

२) वित्त विभागाचे पत्र क्र. व्याअस-२०१३/प्र.क्र.१०६/अर्थ-२, दि. ३१ ऑक्टोबर, २०१३ व त्या सोबतचे बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना :

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळा अंतर्गत असलेल्या सुदी (संग्राहक) ल.पा. योजना, ता.मालेगांव, जि.वाशिम या योजनेस विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय क्र. विपाविमं/कातां-७/४१/सुदी/प्र.मा./(५७/२००९)/०९ दिनांक १२.२.२००९ अन्वये एकूण अंदाजित खर्च रु.४६३.७९ लक्ष किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. यापैकी रु.४२७.६३ लक्ष कामाप्रीत्यर्थ आणि रु.३६.१६ लक्ष अनुषंगिक खर्च आहे. सदर प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव तयार करतांना सन २००८-०९ च्या दरसूचीप्रमाणे अनुज्ञेय दर वापरण्यात आले होते. योजनेच्या कामास सन २०१० मध्ये सुरूवात झाली. मध्यंतरीच्या काळात योजनेच्या किंमतीत दरसूचीतील वाढ, भूसंपादन खर्चातील वाढ, जास्त दराची निविदा स्विकृती,संकल्पनातील बदल व इतर कारणांमुळे प्रशासकीय मान्यता प्राप्त किंमतीत रु.२०१.१७ लाख एवढी वाढ होत असून ती प्रशासकीय मान्यतेच्या (४३.३७%) वाढ होत असल्यामुळे योजनेस प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करणे बाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

सुदी (संग्राहक) ल.पा. योजना, ता.मालेगांव, जि.वाशिम या योजनेचा एकूण अंदाजीत खर्च रुपये ६६४.९६ लक्ष (रु.सहा कोटी, चौसष्ट लक्ष, शहान्नव हजार, फक्त) किंमतीस, सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सदर सुधारित रकमेपैकी रुपये ६२४.४० लक्ष (रुपये सहा कोटी, चोवीस लक्ष, चाळीस हजार, फक्त) कामाप्रीत्यर्थ व रुपये ४०.५६ लक्ष (रुपये, चाळीस लक्ष, छप्पन्न हजार, फक्त) अनुषंगीक खर्च आहे. अंदाजपत्रकात कामासाठी सन २००८-०९ या वर्षाच्या दरसूचीप्रमाणे दर वापरण्यात आले आहेत. उपशिर्षवार तरतूदीचा गोषवारा सोबत परिशिष्टामध्ये जोडला आहे.

या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्र लहान पाटबंधारे यावरील भांडवली खर्च ,५,४७०२-आय - पंचवार्षिक योजनांतर्गत योजना ८०-सर्वसाधारण -१९०सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका (००) (०५) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळास भाग भांडवली अंशदान (४७०२५१०१) या लेखाशिर्षाखाली खर्ची घालावा व त्याखालील शासनाच्या मंजूर अनुदानातुन भागविण्यात यावा.

ठळक बाबी

अ) या योजनेची सिंचन क्षमता २५२ हेक्टर आहे.

ब) या योजनेमुळे एकूण होणारा पाणीसाठा १६०९.७० संघमी. आहे.

क) प्रति सहस्त्र घनमीटर पाणीसाठा किंमत रु.४१३२८/- (मापदंड रु.[illegible]/-)

ड) आर्थिक परतावा दर १४.१९ %

इ) योजनेचे लाभव्यय गुणोत्तर १.१०

हा निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.[illegible]/१४३४, दि.[illegible] अन्वये व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ४८/२०१३ व्यय-१२, दि. २.३.२०१३ नुसार दिलेल्या सहमतीनुसार तसेच वित्त विभागाचे पत्र क्रमांक व्यअस २०१३/प्र.क्र.१०६/अर्थसंकल्प-२ दि ३१ ऑक्टोबर,२०१३ अन्वये व्यय अग्रक्रम समितीने दिलेल्या मंजूरीनुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

या योजनेस प्रदान करण्यात आलेली सुधारित प्रशासकिय मान्यता (३५/२०१३) अनुक्रमांकावर नोंदण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(रा.बा. क्षीरसागर)
शासनाचे अवर सचिव

प्रतिलिपी.

महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर.
वित्त विभाग (व्यय-१२), मंत्रालय, मुंबई ३ २
नियोजन विभाग (कार्यासन १४३४), मंत्रालय, मुंबई ३२.
कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर
मुख्य अभियंता, (वि.प्र.) जलसंपदा विभाग, अमरावती
(सोबत सुधारित प्रशासकीय मान्यतेची परिनिरीक्षण टिप्पणी जोडली आहे)
आंतर वित्त सल्लागार व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
अधीक्षक अभियंता, वाशिम पाटबंधारे मंडळ, वाशिम
कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, वाशिम
अर्थशाखा १/२ (२ प्रती), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
लपा-१ (२ प्रती), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
जिल्हाधिकारी, वाशिम
विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई. (२ प्रती)
लपा-२, संग्रहार्थ.

शासन निर्णय क्रमांक : लपात २२१२/(४९/१२)/लपा-२, दि. ०२ /१२/२०१३ चे परिशिष्ट

सुदी (संग्राहक) ल.पा. योजना ता.मालेगांव, जि.वाशिम

उपशिर्षनिहाय तरतूदी

क्र.	उपशिर्ष	रक्कम (रूपये लाखात)
१.	'ए' प्राथमिक कामे	१.५७
२.	'बी' भू-संपादन	२१८.८४
३.	'सी' मुख्य कामे धरण व सांडवा	३४९.७२
४.	'डी' मुख्य विमोचक	२७.६०
५.	'के' इमारत	४.६७
६.	'ओ' किरकोळ कामे	३.००
७.	'पी' व्यवस्थापन	२.००
८.	'आर' दळणवळण	१५.००
९	"एक्स" पर्यावरण	२.००
	कामाप्रित्यर्थ किंमत एकुण :-	६२४.४०
	आनुषंगिक खर्च	४०.५६
	योजनेची एकूण किंमत	**६६४.९६**